**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT III-2023-24**

**GRADE : VI** | **MARK : 50**
**SUB: MARATHI** | **TIME: 2 HRS**

## विभाग -अ

**प्रश्न.१अ) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** (७)

एक होती नदी. तिच्यात होते खूप खूप पाणी. निळे निळे, थंडगार व स्वच्छ ! इतके स्वच्छ की वरून पाहिले, की तळाची वाळू दिसायची. गोल गोल गोटे दिसायचे अन् सुळसुळ पोहणारे छोटे मासेही दिसायचे. माशांच्या समूहात राहायची मिनू मासळी ! मिनू होती इवलीशी. अगदी तुमच्या हाताच्या छोट्या बोटाएवढी. रुपेरी कल्ल्यांची! इतर मासे तिचे खूप खूप लाड करायचे. तिला क्षणभरही नजरेआड होऊ दयायचे नाहीत; पण मिनूला नदीच्या त्या खोलगट भागात राहायचा कंटाळा आला होता. ती आईला विचारायची, "आई, एवढं पाणी रोज कुठं जातं?" आई म्हणायची, "मिनू, पुढे मोठा समुद्र आहे त्यात जातं! "आई, समुद्र केवढा असतो?" मिनू विचारी. "मला माहीत नाही बाळ." आई म्हणायची."एक दिवस मुसळधार पाऊस पडू लागला. जमिनीवरून पाण्याचे लोंढे वाहायला लागले. नदीचे पाणी गढुळले. मासे बावरून एकमेकांना शोधू लागले; पण कोणीच कोणाला दिसेना. पाणी वेगाने वाहत होते. या गोंधळात मिनूची व आईची चुकामूक झाली व पाण्याबरोबर मिनूही गिरक्या घेत निघाली.

**प्रश्न.१अ) आकृती पूर्ण करा :**

१) नदीच्या पाण्याचे गुणविशेष लिहा.

अ) नदीचे पाणी ☐ १

ब) नदीचे पाणी ☐ १

क) नदीचे पाणी ☐ १

**आ) एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा :**

१) मिनू मासोळी कुठे राहायची ? १

२) मिनूला समुद्र का बघायचा होता ? १

३) मिनू मासोळी कशी होती? १

४) नदीचे पाणी गढूळ का झाले ? १

**प्रश्न.१आ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा** **(७)**

एकविसाव्या शतकात भरेल चंद्रावरती शाळा, चंद्रावरच्या शाळेत नसेल खडू आणि फळा.
छोट्या छोट्या यानांतून शाळेत जातील मुले, बटण दाबताच शाळेचे दार होईल खुले.
दप्तराचे ओझे तेव्हा नसेल पाठीवरती, ऑक्सिजनचा सिलिंडरच न्यावा लागेल वरती.
भाजी-पोळीच्या डब्याची राहणार नाही कटकट, जेवणाची गोड गोळी घेऊन टाकायची पटपट.

अ)आकृती पूर्ण करा:

१. चंद्रावरच्या शाळेत या गोष्टी नसतील. [ ] १

२. चंद्रावरच्या शाळेत या गोष्टी नसतील. [ ] १

३. छोट्या छोट्या यानातून [ ] जातील मुले. १

४. न्यावा लागेल वरती [ ] १

आ)एका वाक्यात उत्तरे लिहा :

(१) चंद्रावरती शाळा कोणत्या शतकात भरेल ? १

(२) चंद्रावरच्या शाळेत जाताना कशाचे ओझे नसेल ? १

(३) चंद्रावरच्या शाळेत कशाची कटकट राहणार नाही ? १

**प्रश्न.२अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा (६)**

मित्र कोणाला म्हणायचे ?जो आपल्याला संकट काळी मदत करतो तो खरा मित्र. माणसाजवळ पैसा खूप असेल, प्रतिष्ठा असेल, तेव्हा सर्वजण त्यांच्या अवतीभोवती गोळा होतात. त्यांचा उदो- उदो करतात पण जेव्हा तो निर्धन होतो तेव्हा त्याच्या कडे कोणीही चुकून ही पाहत नाही. जणू काही आपला व त्याचा संबंध नाही मराठीत एक म्हण आहेच कि 'असतील शिते तर जमतील भुते' पण कठीण काळ आल्यावर जो उपयोगी पडतो. आशा वेळी जो कामास येतो तो खरा आपला हितचिंतक असतो.

अ)आकृती पूर्ण करा:

१. जो आपल्याला संकट काळी मदत करतो तो आपला [ ] असतो. १

२. माणुस जेव्हा [ ] होतो तेव्हा त्याच्या कडे कोणीही चुकून ही पाहत नाही. १

आ) एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. उताऱ्यात आलेली म्हण सांगा १

२. आपला खरा हितचिंतक कोण असतो ? १

३. माणसाचा उदो उदो केव्हा होतो ? १

४. वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. १

**प्रश्न.२ब) पाठाच्या आधारावर विचारलेल्या कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. (८)**

१) मिनूची व आईची चुकामूक का झाली? २

२) घोडमासा पाहून मिनूला का हसू आले ? २

३) चार-पाच ओळीत घोड माश्याचे वर्णन करा. २

४) घर बांधण्यासाठी कोणकोणत्या वस्तू लागतात ? २

५) लेखिकेच्या मते, मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगावा ?

**विभाग ‘ ब’**

**प्रश्न.३ सूचनांनुसार कृती करा. (१२)**

१. समानार्थी शब्द लिहा. (2)

अ. गरम आ. मोठे

२.विरुद्धार्थी शब्द लिहा . (2)

अ. जिवंत आ. शहाणे

३. पुढील शब्दांचे अनेकवचन लिहा . (2)

अ. हाक आ. आई

४. पुढील वाक्यांतील काळ ओळखा. (2)

अ. तू का रडतेस?

आ. मी पोहायला शिकणार आहे.

५.खालील वाक्यातील विशेषण अधोरेखित करा. (2)

अ. फळे घेण्याकरता आईने मला दहा रुपये दिले.

आ. रामचा कोट फाटका होता.

६. पुढील वाक्यप्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (२)

अ. घाबरगुंडी उडणे

आ. पोटाशी घेणे

**विभाग क**

**प्रश्न ४अ) खालील दिलेल्या कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (५)**

(१) माझा आवडता सण दिवाळी

(२) पाण्याचे महत्त्व

**प्रश्न ४आ) खालील दिलेल्या कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (५)**

१) गुरूजींना सुट्टीसाठी अनुमती मागणारे पत्र लिहा.

२) आपल्या आजोबांच्या तब्येतीची चौकशी करणारे पत्र लिहा.

किंवा

**प्रश्न ४आ) खालील दिलेल्या विषयावर कथा लिहा. (५)**

१) प्रयत्नांती परमेश्वर (मुद्देः एक पराभूत राजा - जंगलात पळून जाणे गुहेत राहणे काही दिवस गुहेतून बाहेर न पडणे कोळ्याचे - प्रयत्न कोळयापासून स्फूर्ती युद्ध पुन्हा राज्य मिळवणे बोध.)

२) मैत्रीचे अतूट नाते( मुद्दे: जंगलजा राजा दुपारची झोप एक उंदीर अंगावर खेळणे सिंहाची झोपमोड - उंदराची जीवनदान - देण्याची विनंती सिंहाकडून अभय एकदा सिंह पारध्यांच्या जाळ्यात फसतो सिंहाची गर्जना उंदरांची मदत - • दाताने जाळे कुरतडणे - सिंहाची सुटका - मैत्री.)